
Download

ANTI RAGGING

App

# SAY NO TO RAGGING



# YES TO JOYFULCAMPUS

## What is Ragging?

**Any Act Resulting in:**

- Mental/physical/sexual Abuse
- Verbal Abuse
- Indecent Behaviour
- Criminal Intimidation/wrongful Restraint
- Undermining Human Dignity
- Financial Exploitation/extortion
- Use Of Force

**A STUDENT INDULGING IN RAGGING CAN BE:**

- Cancellation of admission.
- Suspension from attending classes.
- Withholding/withdrawing Scholarship/Fellowship and other benefits.
- Debarring from appearing in any test/ examination or other evaluation process.
- Withholding results.
- Debarring from representing the institution in any regional, national or international meet, tournament or youth festival etc.
- Collective punishment : when the persons committing or abetting the crime of ragging are not identified the institution shall resort to collective punishment as a deterrent to ensure community pressure on potential ragger.



Immediately call

**UGC Anti-Ragging Helpline**

**1800-180-5522 (24X7 toll free)**

**or send an e-mail to helpline@antiragging.in**

सत्यमेव जयते

Ministry of Education
Government of India

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
quality higher education for all




# Foolishly I ragged & got suspended

**Will I get prosecuted?**

**What about my Job prospects?**

Download
ANTI RAGGING
App

# MY FUTURE IS A BIG ?

*Remember RAGGING is for LOSERS*


**Visit UGC Website i.e. www.ugc.ac.in & www.antiragging.in to see UGC Anti Ragging regulations.**
**Are You Being Ragged ?**
Immediately call UGC Anti Ragging Helpline- **1800-180-5522 (24x7 Toll Free)**
Or Send an E-mail to **helpline@antiragging.in**

Ministry of Education
Government of India
सत्यमेव जयते

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
quality higher education for all
ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Printed at JK Offset Graphics Pvt. Ltd.

# DON'T RAG, JUST INTERACT



**RAGGING IN ANY FORM IS PUNISHABLE**

**Visit UGC website i.e. www.ugc.ac.in & www.antiragging.in to see UGC Anti Ragging Regulations**

Download
ANTI RAGGING
App

## Are you being ragged ?

**Immediately call UGC Anti Ragging Helpline**
**1800-180-5522 (24X7 Toll Free)**
**Or send an e-mail to helpline@antiragging.in**

**Issued in public interest by:**
Ministry of Education
Department of Higher Education
Government of India

**Join hands to make your campus ragging free**

सत्यमेव जयते
Ministry of Education
Government of India

ज्ञान-विज्ञान विमुक्तये
विश्वविद्यालय अनुदान आयोग
**University Grants Commission**
quality higher education for all

Printed at JK Offset Graphics Pvt. Ltd.

SAY NO TO RAGGING

# BEFORE YOU EVEN THINK OF RAGGING



Download
ANTI RAGGING
App

## THINK OF

- Humiliation
- Suspension
- Blacklisting
- Ruined Career
- Expulsion
- Possible Prosecution

**Don't just stand and watch. Stop Ragging! Show Character**

*Remember RAGGING is for LOSERS*

**Visit UGC Website i.e. www.ugc.ac.in & www.antiragging.in to see UGC Anti Ragging regulations.**

**Are You Being Ragged ?**

Immediately call UGC Anti Ragging Helpline- **1800-180-5522 (24x7 Toll Free)**
Or Send an E-mail to **helpline@antiragging.in**


सत्यमेव जयते
Ministry of Education
Government of India

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
quality higher education for all
ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Printed at JK Offset Graphics Pvt. Ltd.

## ANTI-RAGGING CELL

Ragging is a criminal offense and a serious violation of human dignity. In compliance with the directives of the **University Grants Commission (UGC)**, **Supreme Court of India**, and **Savitribai Phule Pune University**, our college has established a dedicated **Anti-Ragging Cell** to ensure a safe, supportive, and respectful environment for all students.

### OBJECTIVES:

- **To prevent any form of ragging, harassment, or abuse on campus.**
- **To maintain a healthy and friendly atmosphere among students.**
- **To educate students about the consequences of ragging and promote mutual respect and cooperation.**
- **To provide support and immediate redressal for any complaints related to ragging.**

### FUNCTIONS OF THE CELL:

- **Disseminating awareness about anti-ragging laws and rules through notices, orientation Disseminating awareness about anti-ragging laws and rules through notices, orientation programs, and seminars.**
- **Regular monitoring of sensitive areas such as hostels, canteens, corridors, and playgrounds.**
- **Receiving and addressing complaints of ragging confidentially and promptly.**
- **Taking disciplinary action against the guilty as per institutional and legal guidelines.**
- **Submitting reports to the University/UGC as required.**

**PREVENTIVE MEASURES:**

- **Undertaking by Students & Parents: All students and their parents must sign an anti-ragging affidavit at the time of admission as per UGC norms.**
- **Undertaking Registration form: https://www.antiragging.in/affidavit_affiliated_form.php**
- **Orientation Programs: Conducted at the beginning of the academic year to sensitize students on ragging and its consequences.**
- **Counseling and Helpline: Access to counseling services and a helpline for students to report any untoward incidents.**

# ANTI-RAGGING CELL

| Name of the Member | Designation |
|---|---|
| Prof. Dr. M. B. Waghmare | Chairman and Principal |
| Mr. S. S. Kawade | Joint Secretary, J. T. S. S. P. M. Junnar |
| Mr. B. S. Maskare | Member of Social Worker |
| Sub-Inspector of Police, Junnar Police Station | Member |
| Mr. Raju Doke | Media Correspondent |
| Mr. H. R. Gandhi | Rotary Club of Junior Representative |
| Miss. Siddhi Talande | Student representatives |
| Prof. Dr. R. D. Chaudhari | Vice Principal |
| Prof. Dr. A. S. Patil | Teacher Representative |
| Asst. Prof. S. N. Kasabe | Teacher Representative |
| Asst. Prof. V. K. Rasal | Teacher Representative |
| Prof. Dr. B. M. Mane | N. C. C. Chief |
| Assoc. Prof. Dr. S. S. Khilare | Head, Hostel |
| Mrs. J . S. Sadafule | Non-Teaching Women Representative |
| Mr. N. S. Chavan | Non-Teaching Staff Representative |
| Mrs. S. G. Kedari | Non-Teaching Women Representative |
| Mrs. H. R. Dunke | Non-Teaching Women Representative |
| Asst. Prof. Dr. A. K. Badhe | Coordinator and Head, Gymkhana |

**For any details or complain, contact:**

**SHRI SHIV CHHATRAPATI COLLEGE, JUNNAR DIST- PUNE**

**Anti-Ragging Committee, S.S.C.College, Junnar (Pune)**

**Office Phone No: (02132) 222094**

**E-mail: ssccj@yahoo.co.in**

**UNIVERSITY GRANTS COMMISSION**

**Toll Free No. 1800 – 180 – 5522**

**Email ID: helpline@antiragging.in**

## रैगिंग कशी घटित होते?

रैगिंग खालील एक किंवा अधिक कृतींनी घटित होते :-

a) कोणताही विद्यार्थी किंवा विद्यार्थ्यांचे शब्दांनी बोलुन अथवा लिखित स्वरुपात किंवा कृतीद्वारे केलेले कोणतेही वर्तन, ज्याचा परिणाम नवीन विद्यार्थी किंवा कोणत्याही इतर विद्यार्थ्यांची थट्टा मस्करी करण्यात, किंवा उर्मटपणे वागण्यात, होतो.

b) कोणत्याही विद्यार्थी किंवा विद्यार्थ्यांद्वारे केलेली गुंडगिरी व बेशिस्तीची वागणुक जी कोणत्याही नवीन विद्यार्थी किंवा कोणत्याही इतर विद्यार्थ्यांना त्रास, हालअपेष्टा, शारिरिक, मानसिक इजा पोचवते किंवा भिती वाढवते किंवा दहशत निर्माण करण्यास कारणीभूत ठरते किंवा कारण होण्याची शक्यता असते.

c) कोणत्याही विद्यार्थ्याला अशी कृती करायला सांगणे जी तो सर्वसाधारण जिवनात करणार नाही, ज्यामुळे लाज निर्माण किंवा यातना होतील किंवा पेचात पडेल ज्याचा प्रतिकुल परिणाम नवीन विद्यार्थी किंवा कुठल्याही विद्यार्थ्याच्या शरीर किंवा मनावर होईल.

d) कोणत्याही वरिष्ठ विद्यार्थ्याद्वारे केलेले कार्य ज्याने कोणत्याही इतर विद्यांर्थी किंवा नवीन विद्यार्थ्याच्या नियमित शैक्षणिक उपक्रमात व्यत्यय येईल,त्यास रोखले जाईल किंवा भंग केले जाईल.

e) एका विद्यार्थ्याला किंवा विद्यार्थ्याच्या गटाला नेमुन दिलेले शैक्षणिक काम नवीन विद्यार्थी किंवा इतर विद्यार्थ्यांना पूर्ण करावयास सांगून त्यांची पिळवणुक करणे.

f) विद्यार्थ्यांद्वारे नवीन विद्यार्थी किंवा इतर विद्यार्थ्यांकडून जोर जबरदस्तीने पैसे वसुल करणे किंवा आर्थिक भार टाकणे.

g) कोणतेही शारीरिक दुरुपयोग, ज्यात त्याच्या सर्व भिन्न प्रकारांचा समावेश आहेः लैंगिक अपशब्द, समलिंगी मारपीट कपडे उतरविणे, जबरदस्तीने अश्लील आणि कामुक कृत्य करणे, कामुक अंगविक्षेप, करणे ज्याने आरोग्यास किंवा व्यक्तीला कोणतेही शारीरिक नुकसान किंवा इतर कोणताही धोका होणे.

h) नवीन किंवा कोणत्याही इतर विद्यार्थ्यांना त्रास होईल भीती वाटेल असे सक्रिय किंवा निष्क्रिय स्वरुपात भाग घेऊन केलेली कोणतीही कृती किंवा अपशब्द बोलणे, ई मेल, टपाल, द्वारे पाठविणे, सार्वजनिकरित्या अपमान करणे, ज्यातुन काम विकृत आनंद मिळवणे, किंवा दुस यांना त्रास देऊन किंवा परपिडक रोमांच मिळवणे यांचा समावेश आहे.

i) कोणत्याही नवीन विद्यार्थ्यांवर एका विद्यार्थ्याद्वारे परपिडक आनंद मिळविण्याच्या उद्देशासह किंवा शिवाय केलेली कोणतेही कृती किंवा सामर्थ्य, प्रभुत्व किंवा श्रेष्ठता दाखविणारी कृती जी नवीन विद्यार्थी किंवा इतर कोणत्याही विद्यार्थ्याच्या मानसिक आरोग्य आणि आत्मविश्वासाला प्रभावित करेल.

--

## मला कुठे मदत मिळू शकेल?

1. तुम्ही स्वतःला एकटे आणि असहाय्य समजू नये असे मला वाटते. आम्ही सर्व तुमच्या सोबत आहोत.

2. तुमचे पालक मदतीला आहेत. तुमच्यामुळे तुमच्या पालकांवर ताण पडेल असे वाटू देऊ नका. त्यांच्याशी मनमोकळेपणाने बोला. जर तुमची रॅगिंग होत असेल तर त्यात तुमची चूक नाही, हे त्यांना कळते.

3. आम्ही रॅगिंग निवारण कार्यक्रमाद्वारे तुम्हाला मदत करण्यासाठी तयार आहोत. तुम्ही आम्हाला कोणत्याही वेळी 1800 180 5522 क्रमांकावर फोन करु शकता. हा फोन मोफत आहे. तुम्ही आम्हाला helpline@antiragging.in वर ई मेल सुद्धा करु शकता.

4. तुमच्या महाविद्यालयाचे प्रशासन तुमच्या मदतीसाठी आहे त्यांना मदतीसाठी विचारण्यास लाजु नका. ते तुम्हाला निश्चितपणे मदत करतील. स्थानिय पोलिस आणि स्थानिक प्रशासन सुद्धा तुमच्या मदतीसाठी उपलब्ध आहेत.

5. रैगिंग ची तक्रार कोणीही नोंदवू शकतात. ती केवळ पिडिताने करावी असे गरजेचे नाही. जर तुम्हाला रैगिंग ची एखादी घटना आढळली तर तुम्ही कॉल सेंटरला जरुर माहिती द्यावी. असे करणे हे तुमचे कर्तव्य आहे.

6. तुम्ही निनावीपणे रैगिंगची तक्रार सुद्धा नोंदवू शकता. तथापि तुम्ही हा विकल्प टाळावा, कारण कोणतीही विस्तृत माहिती नसतांना आम्हाला कोणतीही कृती करणे कठीण होऊ शकते. तुमचे नाव गुप्त ठेवले जाईल अशी आम्ही तुम्हाला खात्री देऊ शकतो.
7. तुमच्या तक्रारीवर केल्या गेलेल्या कारवाईसाठी जाणून घेण्यासाठी तुम्ही रैगिंग विरोधी पोर्टल: www.antiragging.in

## मी का आणि मी ऑनलाईन प्रतीज्ञापत्रे कशी वापरू शकतो ?

### का?

1. प्रत्येक विद्यार्थी आणि त्याच्या/तिच्या पालकांसाठी पहिल्या प्रवेशाच्यावेळी आणि त्यानंतर दर वर्षी वार्षिक नोंदणीच्या वेळी रॅगिंग विरोधी प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य आहे. असा विश्वविद्यालय अनुदान आयोग चा नियम आहे.

2. मा. सर्वोच्च न्यायालयाचा असा आदेश आहे की या प्रतिज्ञापत्रांतुन विद्यार्थ्यांची संपर्क माहिती गोळा करावी आणि ती एका केंद्रीकृत स्थानी इलेक्ट्रानिक स्वरुपात साठवावी.

3. आतापर्यंत प्रत्येक महाविद्याल ही माहीती गोळा करत होते. पण ती एका केंद्रीकृत जागी साठवली जात नव्हती. पण यावर्षी, रॅगिंग निवारण मोहीमेने रॅगिंग विरोधी प्रतीज्ञापत्राच्या डाउनलोडसाठी ऑनलाईन पद्धत विकसीत केली आहे. यामुळे महाविद्यालयाच्या प्राधिकारीवर्गाला ही माहिती वेगळेपणाने गोळा करुन संकलन करायची गरज नाही. याने त्यांचे पुष्कळसे श्रम आणि वेळ वाचेल.

### कसे ?

4. ही एक सोपी प्रक्रिया आहे ज्यात तीन पाय यांचा समावेश आहे.
   - पायरी 1: www.ANTIRAGGING.in. किंवा
   - पायरी 2: तिथे आवश्यक ती माहिती भरा आणि फॉर्म सुपुर्द (सबमीट) करा
   - पायरी 3: यशस्वीपणे फॉर्म पूर्ण केल्यावर, विद्यार्थी आणि पालक दोघांसाठीही ई मेल द्वारे प्रतीज्ञापत्र प्राप्त होईल.

5. जर तुमच्याकडे ई मेल पत्ता नसेल तर कृपया लॉग ऑन करण्याआधी ई मेल पत्ता तयार करा. जर तुमच्या पालकांकडे ई मेल/मोबाईल/लँडलाईन फोन नसेल तर घाबरू नका. तुम्ही तुमचे मित्र किंवा नातेवाईकांचे ई मेल/मोबाईल/लँडलाईन देऊ शकता. यात काळजी करण्याचे काही नाही. जर फॉर्म सबमीट करतांना तुम्ही काही चुक केली तर तुम्ही पुन्हा सुरुवात करू शकता आणि माहिती देऊ शकता. यात कोणतीही समस्या नाही. ही एक फारच सोपी प्रक्रिया आहे.

## उच्च शिक्षण संस्थांमध्ये रॅगिंगची दहशत कमी करण्यासाठी विश्वविद्यालय अनुदान आयोग नियमनांचा सारांश, 2009.

1. प्रस्तावना: दिनांक 08/05/2009 रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाच्या दृष्टिकोणातुन आणि केन्द्र सरकार आणि विद्यापीठाने केलेल्या ठरावाला विचारात घेऊन रॅगिंगच्या संकटावर निर्बंध, निवारण व उच्चाटनास कार्यान्वित करण्याची अनुमती दिली गेली.

2. उद्देश्य: देशातील विद्यापीठे, डीम(मानलेली) विद्यापीठे आणि इतर उच्च शैक्षणिक संस्थातून रॅगिंगच्या सर्व स्वरूपांचे उच्चाटन करण्यासाठी, या नियमनांच्या अंतर्गत रैगिंगला निर्बंधित करणे, तसेच त्यास घडू देण्यास रोखून व या संदर्भात लागू केलेल्या नियमनांतर्गत व योग्य लागू कायद्यानुसार रॅगिंगमध्ये सामील व्यक्तींना दंडित करणे.

3. रैगिंग कशाने घटित होते: खालील पैकी एक किंवा अधिक कृत्यांनी रॅगिंग घटित होते:
   a) कोणताही विद्यार्थी किंवा विद्यार्थ्यांचे शब्दांनी बोलुन अथवा लिखित स्वरुपात किंवा कृतीद्वारे केलेले कोणतेही वर्तन, ज्याचा परिणाम नवीन विद्यार्थी किंवा कोणत्याही इतर विद्यार्थ्यांची थट्टा मस्करी करण्यात, किंवा उर्मटपणे वागण्यात, होतो.
   b) कोणत्याही विद्यार्थी किंवा विद्यार्थ्यांद्वारे केलेली गुंडगिरी व बेशिस्तीची वागणुक जी कोणत्याही नवीन विद्यार्थी किंवा कोणत्याही इतर विद्यार्थ्यांना त्रास, हालअपेष्टा, शारिरिक, मानसिक इजा पोचवते किंवा भिती वाढवते किंवा दहशत निर्माण करण्यास कारणीभूत ठरते किंवा कारण होण्याची शक्यता असते.
   c) कोणत्याही विद्यार्थ्याला अशी कृती करायला सांगणे जी तो सर्वसाधारण जिवनात करणार नाही, ज्यामुळे लाज निर्माण किंवा यातना होतील किंवा पेचात पडेल ज्याचा प्रतिकुल परिणाम नवीन विद्यार्थी किंवा कुठल्याही विद्यार्थ्याच्या शरीर किंवा मनावर होईल.
   d) कोणत्याही वरिष्ठ विद्यार्थ्याद्वारे केलेले कार्य ज्याने कोणत्याही इतर विद्यांर्थी किंवा नवीन विद्यार्थ्याच्या नियमित शैक्षणिक उपक्रमात व्यत्यय येईल,त्यास रोखले जाईल किंवा भंग केले जाईल.
   e) एका विद्यार्थ्याला किंवा विद्यार्थ्याच्या गटाला नेमुन दिलेले शैक्षणिक काम नवीन विद्यार्थी किंवा इतर विद्यार्थ्यांना पूर्ण करावयास सांगून त्यांची पिळवणुक करणे.
   f) विद्यार्थ्यांद्वारे नवीन विद्यार्थी किंवा इतर विद्यार्थ्यांकडून जोर जबरदस्तीने पैसे वसुल करणे किंवा आर्थिक भार टाकणे.
   g) कोणतेही शारीरिक दुरुपयोग, ज्यात त्याच्या सर्व भिन्न प्रकारांचा समावेश आहेः लैंगिक अपशब्द, समलिंगी मारपीट कपडे उतरविणे, जबरदस्तीने अश्लील आणि कामुक कृत्य करणे, कामुक अंगविक्षेप, करणे ज्याने आरोग्यास किंवा व्यक्तीला कोणतेही शारीरिक नुकसान किंवा इतर कोणताही धोका होणे.

h) नवीन किंवा कोणत्याही इतर विद्यार्थ्यांना त्रास होईल भीती वाटेल असे सक्रिय किंवा निष्क्रिय स्वरुपात भाग घेऊन केलेली कोणतीही कृती किंवा अपशब्द बोलणे, ई-मेल, टपाल, द्वारे पाठविणे, सार्वजनिकरित्या अपमान करणे, ज्यातुन काम विकृत आनंद मिळवणे, किंवा दुस यांना त्रास देऊन किंवा परपिडक रोमांच मिळवणे यांचा समावेश आहे.

i) कोणत्याही नवीन विद्यार्थ्यांवर एका विद्यार्थ्याद्वारे परपिडक आनंद मिळविण्याच्या उद्देशासह किंवा शिवाय केलेली कोणतेही कृती किंवा सामर्थ्य, प्रभुत्व किंवा श्रेष्ठता दाखविणारी कृती जी नवीन विद्यार्थी किंवा इतर कोणत्याही विद्यार्थ्याच्या मानसिक आरोग्य आणि आत्मविश्वासाला प्रभावित करेल.

**4. रॅगिंग वर प्रतिबंध घालण्याचे उपाय:** संस्था स्तरावर, विद्यापीठ स्तरावर, जिल्हा स्तरावर वगैरे अशाप्रकारचे अनेक उपाय असतात. त्यापैकी काही जे विद्यार्थ्यांस माहिती असणे महत्वाचे आहे ते खालीलप्रमाणे आहेतः

- कुठलीही संस्था कोणत्याही स्वरुपातील रॅगिंग च्या सूचीत घटनेसाठी परवानगी किंवा सूट देणार नाही; आणि सर्व संस्था, संस्थेत किंवा बाहेर,रॅगिगं चे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने या नियमनात समाविष्ट तरतूदीनुसार पण केवळ तेवढेच मर्यादीत नाही, सर्व आवश्यक आणि अपेक्षित उपाययोजना अमलात आणतील.
- सर्व संस्था, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या रॅगिंग मधे सामिल आणि/किंवा त्यास प्रोत्साहन देण्यामधे दोषी आढळणाऱ्यांविरुद्ध किंवा रॅगिंगला प्रोत्साहन देण्यातील कटकारस्थानांमधे सामील असणाऱ्यांविरुद्ध, या नियमनांनुसार कार्यवाही करतील.
- कुठल्याही अभ्यासक्रमाकरीता प्रवेश देण्याच्या उद्देशाचे कोणत्याही संस्थेकडून कोणत्याही इलेक्ट्रॉनीक, दृकश्रवण किंवा छापील किंवा इतर कोणत्याही माध्यमाद्वारे केलेल्या प्रत्येक सार्वजनीक घोषणेमधे सुस्पष्टपणे नमूद केलेले असावे की संस्थेमधे रॅगिंग पूर्णपणे निषिद्ध आहे आणि प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या रॅगिंग करण्यामधे सामिल आणि/किंवा त्यास प्रोत्साहन देण्यामधे दोषी आढळणारे किंवा रॅगिंगला प्रोत्साहन देण्यातील कटकारस्थानांमधे सामील असणारे यांना नियमनांनुसार तसेच त्या वेळेपुरत्या अमलात असणाऱ्या दंडविधीच्या तरतूदीअंतर्गत शिक्षेस पात्र धरले जाईल.
- रॅगिगं प्रतिबंधक हेल्पलाइन आणि संस्थेतील सर्व महत्वाचे पदाधिकारी यांचे दुरध्वनी क्रमांक प्रवेश पुस्तिका/सुचना पुस्तिका किंवा अभ्यासक्रम पुस्तिकेमधे प्रकाशित केले जाईल, ज्यामधे संस्था प्रमुख, शिक्षक, रॅगिंग विरोधी समितिचे सदस्य, आणि रॅगिंग विरोधी पथक यांच्या दुरध्वनी क्रमांकापुरतेच मर्यादीत नाही, तर जिल्हा आणि उप विभागीय अधिकारी वर्ग, वसतीगृहाचे वार्डन आणि इतर संबंधित पदाधिकारी किंवा अधिकारी यांचाही समावेश आहे.
- विद्यार्थ्याने यथोचित रीत्या स्वाक्षरी केलेले विहित नमून्यातील रॅगिंग विरोधी प्रतिज्ञापत्र आणि मातापिता/पालक यांनी स्वाक्षरी केलेले रॅगिंग विरोधी अन्य प्रतिज्ञापत्र प्रवेश,नामांकन किंवा नोंदणीच्या अर्जाबरोबर जोडलेले असणे आवश्यक आहे.(ही दोन्ही प्रतिज्ञापत्रे वेबसाईट वरुन डाऊनलोड करता येतील)
- रॅगिंग विरोधी हेल्पलाईनला प्राप्त होणाऱ्या कोणत्याही क्लेशकारक संदेशाचे प्रसारण त्याचवेळी संस्था प्रमुख, वसतीगृह अधीक्षक,विद्यापीठाशी संलग्नीत संस्थेमधे घटना घडल्यास

संलग्न विद्यापीठाचा केंद्रीय अधिकारी,आवश्यकता भासल्यास संबंधीत जिल्हा प्राधिकरण, आणि आवश्यक वाटल्यास जिल्हा दंडाधिकारी,पोलीस अधीक्षक यांच्याकडे केले जाईल आणि जनतेच्या प्रभावक्षेत्रात असण्यासाठी वेबसाइट वर टाकले जाईल आणि त्याचबरोबर प्रसारमाध्यमे आणि नागरीकांना ते पाहता येईल.

- रॅगिंग विरोधी पथकाची शिफारस प्राप्त झाल्यानंतर किंवा रॅगिंग च्या नोंदवल्या गेलेल्या कोणत्याही घटनेची माहिती प्राप्त झाल्यानंतर, ही बाब दंडविधीअंतर्गत हाताळण्याबाबत संस्था प्रमुख ताबडतोब हे निश्चित करेल, आणि असे करावयाचे झाल्यास, तो स्वतः किंवा त्याच्या वतीने हे कार्य करण्यासाठी त्याने अधिकृतपणे नेमून दिलेल्या समितिच्या सदस्यांद्वारे, अशाप्रकारची माहिती किंवा शिपारस प्राप्त झाल्यानंतर चोविस तासांच्या आत, पोलीस आणि स्थानिक अधिकाऱ्यांसह, योग्य दंडविधी तरतूदीअंतर्गत, प्राथमिक माहिती अहवाल नोंदवण्यासाठी पाऊल उचलेल.
- आयोग, विद्यार्थी व त्याच्या/तीच्या मातापिता/पालक यांनी जाहीर केलेल्या प्रतिज्ञापत्रावरुन यथोचित डेटा बेस राखेल आणि संस्था, एकतर स्वतः किंवा तीने नेमून दिलेल्या एजन्सीमार्फत तो इलेक्ट्रॉनीक पद्धतीने संग्रहित करेल; आणि अशाप्रकारचा डेटा बेस प्राप्त झालेल्या रॅगिंग च्या तक्रारी, आणि त्यावर करण्यात आलेल्या कार्यवाही च्या स्थितीची नोंद म्हणून कार्य करेल.
- आयोग कोणत्याही प्रकारचे आर्थिक सहाय्य किंवा कोणत्याही संस्थेचे सहायक अनुदान यांच्याबाबत विशिष्ट अटीचा समावेश उपयोजन प्रमाणपत्रामधे कोणत्याही साधारण किंवा विशिष्ट योजनेअंतर्गत करेल,जी संस्थेने रॅगिगं विरोधी उपायांसह तयार केली असेल.
- संस्थेमधील कोणत्याही रॅगिंग च्या घटनेचा प्रतिकूल परिणाम राष्ट्रीय मूल्यनिर्धारण आणि अधिस्विकृती परिषद किंवा कोणत्याही अन्य अधिकृत अधिस्वीकृती एजन्सी कडून अधिस्वीकृती, क्रमांकन किंवा श्रेणीकरणाच्या उद्देशाने मूल्यांकन करतांना तिच्या अधिस्वीकृती, क्रमांकन किंवा श्रेणीकरणावर होईल.
- ज्या संस्था अन्य कोणत्याही प्रकारे कायद्याच्या 12B कलमाअंतर्गत अनुदान प्राप्त करण्यास पात्र असतील, ज्यांच्याबद्दल रॅगिंग च्या कुठल्याही घटनेची नोंद नसलेला निष्कलंक अभिलेख असेल, त्या संस्थांना आयोग आर्थिक सहायक अनुदानामधे प्राथमिकता देऊ शकेल.

5. **रॅगिंग च्या घटनेमधील प्रशासकीय कार्यवाही:** रॅगिंग मधे दोषी असलेल्या विद्यार्थ्यास संस्था खाली दिलेल्या पद्धतीचे अनुसरण करुन आणि विहित रीतीनुसार शिक्षा करेलः

- रॅगिंग विरोधी पथकाच्या शिफारसींमधे निश्चित केल्या गेलेल्या रॅगिंग च्या प्रत्येक घटनेच्या वास्तवावर आणि रॅगिंग च्या घटनेचा प्रकार आणि गांभीर्य यावर अवलंबून शिक्षा किंवा अन्य कोणत्याही बाबतीत संस्थेची रॅगिंग विरोधी समिति यथोचित निर्णय घेईल.
- रॅगिंग विरोधी पथकाने निश्चित केलेल्या दोषाचा प्रकार आणि गांभीर्य यावर अवलंबून, रॅगिगं विरोधी समिती, दोषी आढळणाऱ्यांना, खालीलपैकी एक किंवा जास्त प्रकारच्या शिक्षा, ठोठावू शकते, त्या म्हणजे;

  a) वर्गामधील उपस्थिती आणि शैक्षणिक विशेषाधिकार यांपासून निलंबन.

  b) शिष्यवृत्ती/अधिछात्रवृत्ती आणि इतर लाभ रोखणे/काढून घेणे.

c) कोणतीही चाचणी/परीक्षा किंवा अन्य मूल्यांकन प्रक्रियेसाठी प्रतिबंध करणे.

d) निकाल रोखणे.

e) कोणत्याही क्षेत्रीय, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय भेट, क्रीडासत्र, युवा महोत्सव इत्यादींमधे संस्थेचे प्रतिनिधित्व करण्यास नकार देणे.

f) वसतीगृहातून निलंबन/बहिष्करण

g) प्रवेश रद्द करणे.

h) एक ते चार सत्रांच्या कालावधीकरीता संस्थेतून काढून टाकणे.

i) विशिष्ट कालावधीकरीता संस्थेद्वारे बहिष्करण करणे आणि त्याचबरोबर कोणत्याही अन्य संस्थेमधे प्रवेश नाकारणे.

- रॅगिंग ची कृती करणाऱ्या किंवा त्यास प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तीची ओळख न पटल्यास, संस्था सामूहिक शिक्षेचा अवलंब करेल.
- रॅगिंग विरोधी समितिने दिलेल्या शिक्षेच्या आदेशाविरुद्ध अपील केली जाईल, (i)विद्यापीठाशी संलग्न किंवा त्याचा घटक भाग असलेल्या संस्थेच्या आदेशाच्या बाबतीत,विद्यापीठाच्या कुलगुरू कडे; (ii) विद्यापीठाच्या आदेशाच्या बाबतीत, त्याच्या कुलपतीकडे. (iii) संसदेच्या अधिनियमानुसार निर्माण करण्यात आलेल्या राष्ट्रीय महत्व असलेल्या संस्थेच्या बाबतीत, संस्थेच्या कुलगुरू किंवा कुलपतीकडे, जशी बाब असेल त्याप्रमाणे.
- रॅगिंग च्या घटनेस अटकाव करण्याकरीता सूचना देण्याच्या किंवा योग्य कार्यवाही करण्याच्या बाबतीत किंवा जे रॅगिगं च्या तक्रारींबद्दल निरुत्साही, भावनाशून्य प्रवृत्ती दर्शवतात, किंवा जे योग्य वेळेस पावले उचलण्यामधे अपयशी ठरतात, या नियमनांमधे आवश्यक असल्यास किंवा अन्य कारणाने रॅगिंग च्या घटनेस किंवा घटनांना प्रतिबंध घालण्याकरीता, जेव्हा नियुक्ति प्राधिकाऱ्याच्या मतानुसार, चुकीचा संबंध विद्याशाखेच्या कोणत्याही सदस्याशी किंवा संस्थेच्या कर्मचारीवर्गाशी जोडता येण्यासारखा असेल, तर विद्याशाखेच्या सदस्याविरुद्ध किंवा कर्मचाऱ्याविरुद्ध , अशाप्रकारच्या अधिकाऱ्यामार्फत विभागीय शिस्तभंगाची कार्यवाही संस्थेच्या विहित पद्धतीनुसार करण्यात येईल. जेव्हा अशाप्रकारच्या चुकीचा संबंध संस्था प्रमुखाशी असेल, तर अशाप्रकारच्या प्रमुखाची नियुक्ती करण्यासाठी नेमून दिलेला अधिकारी वर्ग ही विभागीय शिस्तभंगाची कार्यवाही करेल, आणि ही कार्यवाही, रॅगिंगला प्रोत्साहन देणे व रॅगिंग ला प्रतिबंध घालण्याच्या बाबतीत योग्य पावले उचलणे किंवा रॅगिंग मधे दोषी आढळणाऱ्या विद्यार्थ्यास शिक्षा करणे यात अपयशी ठरण्याच्या बाबतील जी कार्यवाही केली जाऊ शकते त्याबद्दलच्या कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय असेल.

## मा. सर्वोच्च न्यायालयाने 8 मे 2009 रोजी दिलेल्या निर्णयाचा सारांश

1. मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला आहे की राघवन कमिटी द्वारे केल्या गेलेल्याअनेक शिफारसी ताबडतोब अमलात आणल्या जाव्यात. या शिफारसींमध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे -

   - आत्मविश्वास वाढविण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना जसे समुपदेशकाची नेमणूक करणे; नवीन किंवा कनिष्ठ वर्गातील विद्यार्थी आल्यानंतर 1 किंवा 2 आठवड्याने जुन्या किंवा वरिष्ठ विद्यार्थ्यांना महाविद्यालयात बोलावणे; एकत्रित संवेदना जागृती कार्यक्रमांचे आयोजन; मुख्याध्यापक/संस्थेच्या प्रमुखांच्या उपस्थितीत नवीन आणि वरिष्ठ विद्यार्थ्यांना एकत्र बोलावून त्यांची एकमेकांशी अभिमुख करुन देणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन; मोठ्या प्रमाणावर सांस्कृतिक, खेळ व इतर गतिविधींचे आयोजन करणे;,वसतिगृहात राहणाऱ्यां विद्यार्थ्यांसोबत त्यांच्या वसतिगृहात शिक्षकांसोबत जेवण आयोजित करणे इ.
   - प्रत्येक संस्थेत रॅगिंग विरोधी समिति आणि रॅगिंग विरोधी दळ असणे आवश्यक आहे. विद्यापीठ स्तरावर रॅगिंगवर लक्ष्य ठेवण्यासाठी निगरणी गट असावा, जो संलग्न कॉलेजांशी आणि त्याच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या संस्थांशी संयोजन करेल. राज्य विद्यापीठात कुलपतींच्या स्तरावर एक निगरणी गट असावा.
   - कॅम्पसच्या बाहेर खाजगी व्यापारी तत्वावर चालणारी वसतिगृहे व हॉस्टेल यांची संख्या पाहता, या हॉस्टेल व त्यांचे व्यवस्थापन यांचे स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे आणि अशी हॉस्टेल सुरू करणे व नोंदणी करण्यासाठी शिक्षण संस्थेच्या प्रमुखाची परवानगी व शिफारस असणे गरजेचे आहे. रॅगिंगच्या व्याख्येअंतर्गत येणाऱ्या घटनांवर जागरुक असणे हे स्थानिक पोलिस, स्थानिक प्रशासन तसेच संस्थेच्या अधिकाऱ्यांसाठी अनिवार्य आहे.
   - वॉर्डन पूर्णवेळ उपलब्ध असावा आणि त्यामुळे तो दूरध्वनी आणि संपर्काच्या इतर माध्यमावर उपलब्ध असावा हे महत्वाचे आहे. त्याचप्रमाणे इतर महत्वाचे व्यक्ती अधिकारी जसे संस्थेच प्रमुख, शिक्षक, रॅगिंग विरोधी समितीचे सदस्य, जिल्हा व प्रभाग अधिकारी आणि संबंधित राज्य सरकारचे अधिकारी यांच्या दूरध्वनी क्रमांकांचा व्यापक प्रमाणात प्रसार करावा जेणेकरून गरजू व्यक्ति त्यांच्याशी संपर्क करू शकतील किंवा आणिबाणीच्या प्रसंगात मदत मागू शकतील.
   - प्रत्येक शैक्षणिक सत्राच्या सुरवातीला प्रत्येक विद्यार्थ्याला विवरण पुस्तिका किवा छोटे पुस्तक/लघुपत्र वितरित करावेत ज्यात रॅगिंग करणे किंवा रॅगिंग करणाऱ्यांना मदत करणे यात सामिल होणार नाही असे त्यांच्याकडून लिखित स्वरूपात घ्यावे, तसेच रॅगिंगला अटकाव आणि निवारणाच्या पद्धती यांची रूपरेखा त्यात असावी.

- शिक्षण संस्थांनी ह्या गोष्टींची खातरजमा करावी की प्रत्येक वसतिगृहासाठी पूर्णवेळ वॉर्डन असावा ज्याने वसतिगृहातच राहावे किंवा जवळपासच कोठेतरी राहावे.

2. मा. सर्वोच्च न्यायालयाने हे स्वीकृत केले आहे की मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार, विश्वविद्यालय अनुदान आयोग, भारतीय वैद्यकिय परिषद, अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद आणि यासारख्या इतर नियामक मंडळांशी विचार विनिमय करून डॉ. राज कचरू यांनी सुचविल्याप्रमाणे केंद्रीय संकटकालीन हॉटलाईन आणि रॅगिंगविरोधी डेटाबेस बनविण्याच्या प्रक्रियेत आहे. तथापि मा. सर्वोच्च न्यायालयाने त्यात खालील गोष्टी जोडल्या आहेत, ज्या आहेतः
   - डेटाबेसची देखरेख करण्याचे काम अशासकिय एजंसीला देण्यात यावे, जिची नियुक्ती भारतीय संघ राज्याने ताबडतोब करावी ज्यामुळे लोकांमध्ये विश्वास निर्माण होईल आणि नियमांचे पालन न होण्याच्या घटनांची माहिती नियामक मंडळ आणि राघवन समितीला मिळेल.
   - प्रत्येक विद्यार्थी आणि त्याचे/तिचे पालक/अभिभावक यांच्याकडून प्रतिज्ञापत्राद्वारे वचन घेऊन डेटाबेस तयार करावा, अशी प्रतिज्ञापत्रे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने संग्रहीत करावी आणि त्यात प्रत्येक विद्यार्थ्याची सविस्तर माहिती असावी.
   - डेटाबेस रॅगिंगच्या विरोधात आलेल्या तक्रारीचा रेकॉर्ड म्हणून आणि त्याविरुद्ध केलेल्या कारवाईची स्थिति जाणण्यासाठी म्हणुन सुद्धा कार्य करेल.

3. मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला आहे की रॅगिंगची दहशत थांबविण्यासाठी विश्वविद्यालय अनुदान आयोग तर्फे प्रतिपादित केलेल्या अधिनियमांचे इतर नियामक मंडळानी जसे अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद, भारतीय वैद्यकिय परिषद, गुन्हा माहिती विभाग, नेटवर्क चॅनल इंटरफेस, इ. अंगिकार करणे अनिवार्य आहे.

4. मा. सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारले आहे की अमन कचरूच्या मृत्युची घटना स्पष्टपणे संकेत देते की फक्त दिशानिर्देश आणि कायदे बनविणे पुरेसे नाही. त्यामुळे मा. न्यायालयाने आदेश दिले आहेत की अशा कायद्यांना कठोरपणे अमलात आणले जावे आणि अशा संस्थेचे प्रमुख/ प्रशासन, जे रॅगिंगला अटकाव करण्यासाठी आणि रॅगिंग करणा यांना शिक्षा देण्यासाठी वेळेवर पाऊले उचलत नाही त्यांना यासाठी दंड करण्यात यावा. दंडात्मक कारवाईत शिवाय अशा संस्थांचे प्रमुख/ प्रशासनाचे अधिकारी/ शिक्षक/ शिक्षेकेतर कर्मचारी जे रॅगिंगच्या तक्रारींबद्दल उदासीन किवा संवेदनशून्य अविर्भावाने वागले त्यांच्यावर विभागीय चौकशी सुरू करावी.

5. मा. सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे की फक्त विद्यार्थीच नाही तर, शिक्षकांनासुद्धा रॅगिंगचे दुष्परिणाम आणि त्याला अटकाव करण्याबद्दल संवेदनक्षम असणे जरूरी आहे. शिक्षेकेतर कर्मचारी ज्यात प्रशासकीय अधिकारी, करारारांतर्गत कर्मचारी, सुरक्षा रक्षक, इत्यादींचा समावेश होतो, त्यांनी सुद्धा रॅगिंगमुळे होणारे नुकसान व दुष्परिणाम याबाबत सं्वेदनक्षमता दाखविणे जरूरी आहे.

6. मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला आहे की मुख्याध्यापक किवा संस्था/विभाग प्रमुखांनी संस्थेच्या प्रत्येक कर्मचाऱ्याकडून लिखित स्वरूपात वचन घावे की तो/ती, त्याच्या/तिच्या निदर्शनास आलेल्या कुठल्याही रॅगिंगच्या घटनेची सूचना ताबडतोब देईल, यात शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी, करारारांतर्गत कर्मचारी जे परिसरात उपहारगृह चालविण्यासाठी किवा देखरेख व निगरणी कर्मचारी किंवा इमारत/बगिच्याच्या स्वछतेसाठी व देखरेखीसाठी आहेत, इत्यादींचा समावेश आहे. नोकरीच्या नियमात अशी तरतूद करावी की, कर्मचाऱ्यांपैकी जो कोणी रॅगिंगची माहिती देईल त्याच्या नोकरीच्या रेकॉर्डमध्ये यासंबंधी नोंद होऊन त्याला प्रशंसापर प्रशस्तिपत्रक देण्यात येईल.

7. मा. सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे की नवीन विद्यार्थ्यांच्या पालक/अभिभावकांनी जवाबदारी ओळखून रॅगिंगची कोणताही घटना ताबडतोब संस्थेच्या प्रमुखाच्या निदर्शनास आणून देणे गरजेचे आहे.

8. मा. सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे की स्टेशन हाऊस ऑफिसर / पोलिस अधिक्षक, ज्यांच्या कार्यकक्षेत संबंधित महाविद्यालय येते, त्यांची ही जवाबदारी आहे की संबंधित महाविद्यालयाच्या परिसरात रॅगिंग होणार नाही, आणि रॅगिंग झाल्यास त्याच्या प्रभावीपणे सामना करण्यात यावा. एकदा केंदीय डेटाबेस/ संकटकालीन हॉटलाईन कार्यान्वित झाली की, संकटकालीन हॉटलाईन कर्मचाऱ्यांकडून स्टेशन हाऊस ऑफिसर / पोलिस अधिक्षक ला, सूचना मिळताच, ज्याच्या कार्यकक्षेत संबंधित महाविद्यालय येते त्या स्टेशन हाऊस ऑफिसर / पोलिस अधिक्षक ला घटनेचा सामना करणे सोपे जाईल आणि संकटकालीन हॉटलाईन कर्मचाऱ्यांना किंवा स्वतंत्र देखरेख यंत्रणेला मदत व संपर्क करणे सोपे जाईल. यामुळे विश्वास निर्माण होईल आणि लोकांना न घाबरता किंवा विनाविलंब रॅगिंगची तक्रार करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल.

9. मा. सर्वोच्च न्यायालयाने म्हंटले आहे की एकदा डेटाबेस/संकटकालीन हॉटलाईन कार्यान्वित झाली की, राज्य सरकारला त्यांच्या रॅगिंग विरोधी कायद्यात सुधारणा करून संस्थांच्या प्रमुखांना दंडीत करण्याची तरतूद करता येईल. -